**निशाणी क्रमांक २९** **सं. फौ.ख. क्र. ८९०/२०१७**
सरकार विरुध्द महेंद्र

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ चा शपथेवर जबाब</u>**

मी सत्य प्रतिज्ञावर कथन करतो की,

माझे नाव : **विनोद दादाजी गोडबोले**
माझे वय : ४४ वर्ष
हुद्दा : पोलीस निरीक्षक,
नेमणूक : पोलीस ठाणे अंबाझरी, नागपूर.

**सरतपास सरकारी अभियोक्ता श्री. एस.पी. देशमुख यांचे मार्फत**

**१.** दिनांक १२/०४/२०१७ रोजी मी एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन येथे दिवसपाळी अधिकारी म्हणून कार्यरत होतो. सदर दिवशी मला लता मंगेशकर हॉस्पीटल मधून एम.एल.सी. प्राप्त झाली होती. आता मला सदर एम.एल.सी. दाखविण्यात आली, ती तिच असून सदर एम.एल.सी. प्राप्त केल्याबाबत त्यावर माझी सही आहे. एम.एल.सी. ला **निशाणी ३०** देण्यात येत आहे.

**२.** त्यानंतर मी लता मंगेशकर हॉस्पीटलमध्ये जावून अनोळखी जखमीचे बयान नोंदविण्याबाबत पत्र दिले. आता मला सदर पत्राची स्थळप्रत दाखविण्यात आली. ती तिच असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ३१** देण्यात येत आहे. त्यानंतर मी जखमीच्या भावाचा जबाब लता मंगेशकर हॉस्पीटल येथे नोंदविला. आता मला सदर जबाब/फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर फिर्यादीची आणि माझी सही आहे. सदर फिर्याद फिर्यादीच्या सांगण्यावरून नोंदविण्यात आली. त्यावर फिर्यादीची सही आहे ती मी ओळखतो. फिर्यादीस **निशाणी ३२** देण्यात येत आहे. तसेच आता मला छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. तो मी तयार केला असून बरोबर आहे. त्यावर माझी आणि फिर्यादीची सही आहे. त्यातील मजकूर खरा आहे. छापील प्रथम खबरी अहवालास **निशाणी ३३** देण्यात येत आहे.

**३.** त्यानंतर मी घटनास्थळाला भेट देवून दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. आता मला सदर पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच असून त्यावर माझ्या आणि पंचांच्या सह्या आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. पंचनामा निशाणी क्र. १३ वर आहे.

**४.** त्यानंतर मयताचा मृतदेह शवविच्छेदनाकामी जी.एम.सी. हॉस्पीटल येथे पाठविण्यात आला. तसेच, अपघातातील वाहन आरोपीची कार याचे आर.टी.ओ. कडून तांत्रिक तपासणी करुन घेतली. आता मला सदर

तपासणीकामी दिलेल्या पत्राची स्थळ प्रत दाखविण्यात आली. ती तीच असून त्यास **निशाणी ३४** देण्यात येत आहे. त्यानंतर मला सदर वाहनाचा तांत्रिक अहवाल आर.टी.ओ. कडून प्राप्त झाला. आता मला सदर अहवाल दाखविण्यात आला तो तोच असून बरोबर आहे त्यास **निशाणी क्र. ३५** देण्यात येत आहे.

**५.** तपासाअंती असे निष्पन्न झाले की, आरोपी याने त्याच्या ताब्यातील स्वीफ्ट कार राजीव नगर बस स्टॉप जवळ निष्काळजीपणे चालूवन मयत वामन भिमराव गोतमारे यास धडक देवून त्याच्या मृत्युस कारणीभूत ठरला. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. तो आजरोजी न्यायालयात हजर नाही. (आरोपीचा गैरहजेरीचा अर्ज **निशाणी २८** वर आहे.)

सरतपास संपला.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. धिरज लामसोंगे यांच्या मार्फत**

**६.** हे म्हणणे खरे आहे की, मी घटनेच्या दिवशी पोलीस स्टेशनला हजर असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीची फिर्याद त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदविली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी एफ.आय.आर. चुकीच्या पध्दतीने नोंदविली आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचनामा करणेकामी पंचांना लेखी सूचनापत्र दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कधीही घटनास्थळावर गेलेलो नव्हतो व घटनास्थळाचा पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाहनाच्या तपासणीसाठी कोणतेही पत्र दिलेले नाही,तसेच वाहनाचा तांत्रिक अहवाल प्राप्त केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे जबाब त्यांच्या म्हणण्याप्रमाणे नोंदविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी योग्य तपास न करता खोटे दोषारोपपत्र आरोपीविरुध्द दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा./–

ठिकाण : हिंगणा

[ **व्ही. आय. शेख** ]

दिनांक : ०५/०५/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, हिंगणा.